# पोलीस आयुक्तालय
## मिरा-भाईंदर, वसई-विरार

सेक्टर ०५, रामनगर शांती-गार्डन,मिरारोड (पुर्व) ठाणे ४०११०७
Email ID- dcphq.mb-vv@mahapolice.gov.in


जा.क्र.:- वि.शा/टे-१३/मनाई आदेश/२०२५-१८७ दिनांक:-२० /०२/२०२५

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ पोटकलम (१) व (३) अन्वये मनाई आदेश**

ज्या अर्थी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, अतिक्रमण हटवणे तसेच **दिनांक २६/०२/२०२५ रोजी महाशिवरात्री** या सण-उत्सवाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम व मिरवणुका, रॅलीचे आयोजन करण्यात येते.

ज्या अर्थी **मी सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)** पोलीस आयुक्तालयाकडील क्रमाकं/पो.आ.वा./अधि.प्रदान/आदेश/३०/२०२० दिनांक ०९/११/२०२० अन्वये, मा. पोलीस आयुक्त यांचे महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) चे वापरावयाचे अधिकार आम्हास प्रदान करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील काशिमिरा, काशिगाव, मिरारोड, नवघर, नयानगर, भाईंदर, उत्तन, वसई, माणिकपुर, तुळींज, आचोळे, वालीव, नायगाव, नालासोपारा, विरार, पेल्हार, अर्नाळा, मांडवी व बोळींज असे एकुण १९ पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, समाज कंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे.

त्या अर्थी वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर वसई-विरार, महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) अन्वये जिवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालील प्रमाणे मनाई आदेश देत आहे.

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठया किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बाळगणे.
२. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.
३. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.
४. व्यक्तींच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.
५. सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वादय वाजवणे.
६. सभ्यता अगर निती या विरुध्द असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथुन पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शित करणे.
७. पाच किंवा पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

**वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागु राहणार नाही.**

"जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सुट दिलेली आहे."

**सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागु राहणार नाहीत.**

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

३. सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेरी येथे जमलेले लोक.

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

६. सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेली ठिकाण.

सदर मनाई आदेश **दिनांक २४/०२/२०२५ रोजीचे ०२.०० वाजे पासुन ते दिनांक १०/०३/२०२५ रोजीचे २४.०० वाजे** पर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**दिनांक - /०२/२०२५**

20/02/25

**(सुहास बावचे)**
**पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार**

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**प्रत:-**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग (विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सविनय सादर.

२. मा. पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांना सविनय सादर.

३. मा. अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांना सविनय सादर.

४. मा. जिल्हाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे, पालघर यांना सविनय सादर.

५. मा. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे, पालघर यांचेकडे वृत्तपत्रात बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी.

६. सर्व परिमडळीय पोलीस उप आयुक्त,मि.भा.व.वि.

७. सर्व सहायक पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.

८. सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.

९. सरकारी मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांना पुढील प्रसिध्दी होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी रवाना.

१०. नस्तीकरिता